वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेसने निवडणूकीचे रणशिंग फुकले!

## आ.सना मलिक यांचे प्रेमलता पारवे आणि नगरसेवकांच्या विजयासाठी 'पायी वादळ'



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### रॅली आणि सभांना प्रचंड प्रतिसाद







बीड, (दिव्य न्युज):- आगामी बीड नगर परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित दादा पवार गट), शिवसेना आणि शिवसंग्राम मित्र पक्षाने प्रचाराचे मैदान दणाणून सोडले आहे.नगर अध्यक्षपदाच्या धडाकेबाज उमेदवार प्रेमलता दादाराव पारवे आणि सर्व नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारासाठी, फायरब्रँड नेत्या आमदार सना मलिक यांनी आज शहरात पायी रॅली आणि वादळी कॉर्नर सभांचा झंझावात उभा केला.

बीडमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या आ.सना मलिक यांचे पायी रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे, नगरसेवक पदाचे उमेदवार फारुख पटेल, प्रिया डोईफोडे, शेख निजाम, महेश धांडे, अशपाक इनामदार, बिलाल शेख, मोमीन जकियोद्दीन, जैतुल्ला खान, सादेकुजमा,गोडसे मिना मनोज, मोमीन जुबेर, हाफिज अश्फाक यांच्यासह शेख तय्यबभाई, शेख मुजीबभाई, शेख जमीलमामू, अलीम पटेल, शेख शकील, शेख इम्रान, आवेज इनामदार, शेख फहीम, ड. सय्यद खाजा, कुस्तीपटू अल्फिया

▸▸ पान २ वर

# सगळेच झटणार पण नाना नाही हटणार!

## अमरनाना नाईकवाडे यांच्या पाठीशी मतरूपी आशिर्वादाचा ढिग लावण्याचा मतदारांचा निर्धार



**सुभाष रोड, मोंढा रोड उभा राहून कोणी करुन घेतला ? कोविडमध्ये कोण पुढं आलं? कीट घालून पेशंटला भेटायला कोण गेलं ?नळाला पाणी किती वाजता येणार हे सांगणारा पहिला नगर सेवक,नगर पालिकेतील कागदपत्रं काढण्यासाठी कोण मदत करतयं ? अपघात झाला तर मदतीला कोण येतयं ? लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळवून देण्यासाठी,कोण सरसावलं ? शासकीय योजना वार्डात कोण पोहोचवतयं ? वार्डातील अंतर्गत रस्ते कोणी केले? गरज पडल्यास पोलीस ठाण्यात कोण धावून येतयं? या सर्व प्रश्नांचं एकच उत्तर ते म्हणजे नाना..!**

बीड, (दिव्य न्युज): अभ्यासू, प्रत्येक मुद्याची अचूक माहिती, सर्वसामान्यांच्या प्रश्नावर आक्रमक होण्याची भूमिका आणि लोकांच्या कामांविषयी असलेली तळमळ असणारा एकमेव चेहरा म्हणजे अमर नाना नाईकवाडे यांची ओळख आहे.प्रभागातील गल्लीपासून ते नगर पालिकेच्या सभागृहापर्यंत आपल्या खणखणीत आवाजाने अख्खे बीड शहर दणाणून सोडणाऱ्या अमर नाना यांच्या पाठीशी जनमताची ताकद उभी राहू लागली आहे. गेल्या १४ वर्षांपासून जनसेवक म्हणून काम करणाऱ्याच्या

▸▸ पान २ वर

# बीडच्या विकासाचं नवं पान जनतेच्या विश्वासाने विजयाची नवी उमेद!

## …कदा संधी द्या या संधीचे सोनं करू : संदीप क्षीरसागर



### सर्व जातींच्या लोकांची तुतारीला साथ

बीड, (दिव्य न्युजल):- बीडमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकोप्याने राहतात. कितीही प्रयत्न केले तरी येथील सामाजिक सलोखा बिघडला नाही, आणि बिघडणार नाही. आणि ही एकजूटच आपली ताकत आहे, असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. बीड नगरपरिषदेसाठी नुकताच राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांसाठी आ.संदीप क्षीरसागर प्रचाराला नुकतीच सुरुवात केली आहे. सुरूवातीलाच राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र

▸▸ पान २ वर

# वार्ड क्रमांक १९ मध्ये सँडी ग्रुपचा उमेदवार हुकमी एक्का ठरणार

बीड , (दिव्य न्युज):- बीड वॉर्ड क्रमांक १९ : योगेश भैय्यांचा मैदानात ओपन हुकमी एक्का दाखल सँडी ग्रुपची दमदार एन्ट्री बीड शहरातील राजकीय तापमान चढत असताना वॉर्ड क्रमांक १९ मध्ये एक मोठी राजकीय सराईत चाल पाहायला मिळाली आहे.योगेश भैय्यांनी यांच्या प्रबळ बालेकिल्ल्यात सँडी ग्रुप हा ओपन हुकमी एक्का' टाकत सँडी ग्रुप ची जोरदार एन्ट्री केली आहे. अनेक वर्षे एकाच भूमिकेतून, एकाच बॅनरखाली आणि अध्यक्ष साहेबांच्या ठाम



नेतृत्वाखाली वर्षानुवर्षे निष्ठा टिकवणारा सँडी ग्रुप तब्बल १८ वर्षांनंतर पुन्हा एकदा निवडणुकीच्या रणांगणात उतरला आहे. या दीर्घ कालावधीनंतरची त्यांची एंट्रीच राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.परसराम जाधव यांच्या विजयाची धुरा सँडी ग्रुप'कडे सँडी ग्रुपचे अध्यक्ष तथा सँडी ची प्रतिछाया मानले जाणारे दादू (शेठ )जाधव यांच्याकडे परसराम जाधव यांच्या विजयाची संपूर्ण रणनीती आणि धुरा सोपवण्यात आली आहे. स्थानिकांमध्ये दादू जाधव यांच्या आयोजन कौशल्याची, जनसंपर्कातील बळाची आणि माणसांशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या खास पद्धतीची चर्चा

▸▸ पान २ वर

# प्रभाग क्रं. १७ मध्ये बिलालभैय्या शेख यांची घड्याळ हाऊसफुल

## प्रभागातील मतदारांनीच घेतली बिलालाभैय्यांची निवडणूक हाती

## ३ तारखेला विजयाचा गुलाल उधळण्यासाठी कार्यकर्ते झाले सज्ज





### विरोधक झाले मात्र गुल

बीड, (दिव्य न्युज):- काल उमदेवारी अर्ज मागे घेतल्यानतर आता खऱ्या लढतीला सुरूवात झाली आहे. निवडणुकीच्या रिंगणात अध्यक्ष पदासाठी १९ उमेदवार तर नगरसेवकांच्या ५२ जागेसाठी ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २ तारखेला मतदान झाल्यानंतर कोणाला विजयाचा गुलाल लागतो याकडे आता बीडकरांचे लक्ष लागले आहे. येणाऱ्या ४ दिवसात प्रचाराचा अजुन जोर वाढेल. प्रभाग क्रं.१७ हा महत्वाचा प्रभागा असून या प्रभागात अजित पवार

▸▸ पान २ वर

# सहाल चाऊस यांच्यावर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या आ.सोळंकेंनी आपल्या घरात किती पदाधिकारी याचं आत्मपरिक्षण करावे



## बाबुराव पोटभरेंचा सल्ला; माजलगावात राष्ट्रवादीच्या तुतारीचा प्रचाराचा शुभारंभ

माजलगाव (दिव्य न्युज):- आ.प्रकाश सोळंके यांनी सहाल चाऊस यांच्यावर घराणेशाहीचा आरोप करण्याआधी आपल्या घरात किती पदाधिकारी आहेत ? याचं आत्मपरिक्षण करावं असा सल्ला बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी दिला. आमचा विरोध त्यांच्या भ्रष्ट कारभाराला आहे असा आरोप देखील पोटभरे यांनी यावेळी केला. माजलगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बाबूराव पोटभरे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सहाल चाऊस यांच्यासह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार आणि नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार उपस्थित होते. यावेळी पोटभरे यांनी आ.सोळंकेंच्या कारभारावर सडकून टिका केली. माजलगावच्या विकासासाठी सहाल चाऊस आणि आम्ही कटीबध्द आहोत असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# बीड न.प.अध्यक्ष पदासाठी अनुसुचित जातीच्या जागेवर चुकीची उमेदवारी

## सोमवारी आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक



बीड, (दिव्य न्युज):- बीड न.प. निवडणुकीत अनुसूचित जातीच्या महिलासाठी आरक्षित झालेल्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी युवा रिपाइं प्रदेशध्यक्ष पप्पू कागदे यांना राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय युतीमधून अजित पवार यांच्या गटाकडून जाहीर करण्यात आलेली उमेदवारी नाकारून ऐनवेळी आयात करण्यात आलेल्या व समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या उमेदवारास घडी या चिन्हावर उमेदवारी देऊन मागासवर्गीयांना आरक्षणाच्या संधीपासून डावलणाऱ्या अजित पवार गटाच्या उमेदवारास धडा शिकवण्यासाठी सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड शहरातील आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक आयोजित करण्यात आली आहे.

अजित पवार यांच्या गटाकडून ऐनवेळी पप्पू कागदे यांना उमेदवारी डावलून आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन आरक्षणाच्या संधीपासून मागासवर्गीयांना डावलण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे बीड जिल्ह्यासह शहरातील आंबेडकरी समाज बांधवांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला धडा शिकविण्यासाठी व ऐनवेळी आयात केलेल्या उमेदवारास पराभूत करण्यासाठी बीड शहरातील बौद्ध, मातंग, चर्मकार, वाल्मिकी, वडार व अनुसूचित जामातीमधील समाज बांधवांसह आंबेडकर समाज बांधवांची निर्णायक बैठक सोमवार दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल नीलकमल, नगर रोड बीड येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.

तरी या निर्णायक बैठकीस बीड शहरातील सर्व आंबेडकरी समाज बांधवांनी दि. २४ नोव्हेंबर २०२५ सोमवार रोजी ठीक १० वाजता हॉटेल नीलकमल, नगर रोड बीड येथे उपस्थित रहावे. असे आवाहन बीड शहरातील सर्वपक्षीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# गेवराई पंचायत समितीच्या अभियंत्याला १ हजाराची लाच मागितल्याप्रकरणी अटक

गेवराई, (दिव्य न्युज):- गेवराई पंचायत समिती कार्यालयातील अभियंत्याने एका शेतकर्यांकडे गायगोठ्याची फाईल करण्यासाठी १००० रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्या अभियंत्याच्या मुसक्या बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. विनायक राठोड असे लाचखोर अभियंत्याचे नाव आहे.

विनायक राठोड याने १९ नोव्हेंबर रोजी १००० रुपयांच्या लाचेची मागणी त्याच्या बीड शहरातील अंबिका चौकातील एका प्रायव्हेट कार्यालयात केली होती. संबंधित तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी बीडच्या लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खात्री पटल्यानंतर एसीबीने सापळा लावला.परंतु, राठोडला संशय आल्यानंतर त्याने तक्रारदाराला टाळायला सुरूवात केली. मात्र, लाचेची मागणी केल्यावरून विनायक राठोड यास बीड एसीबीने बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई बीडचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे डीवायएसपी सोपान चित्तमपल्ले यांनी आज दुपारी सव्वा एकच्या सुमारास केली.गेवराई पंचायत समिती म्हणजे भ्रष्टाचाराचा अड्डा आहे. छोट्या मोठ्या कामांसाठी येथे हमखास जिरी मिरी घेतली जात असल्याची चर्चा आहे. परंतु वरिष्ठ अधिकारी याकडे डोळेझाक करतात, असा आरोप नागरिकांतून केला जात आहे.

पान ४ वरून

## जे काम २५

पायातील चप्पल हातात घेवून चालावे लागत होते ही परिस्थिती पाहून मोमीन अझहर यांनी पाठपुरावा केला आणि या परिसरात सिमेंट रस्तेसाठी निधी मंजूर करून घेत अत्यंत दर्जेदार सिमेंट रस्ते आणि सिमेंट नाल्या केले. ज्यामुळे नागरीकांना मोठा त्रास कमी झाला आणि या दर्जेदार कामामुळे मोमीन अझहर यांनी मतदारांच्या मनात कायम घर करून ठेवले. प्रभागातील गोरगरीबांना चांगला आणि उत्तम दर्जेचा पक्का घर राहायला मिळावे म्हणून प्रभागातील तब्बल १४३ कुटुंबाना घरकुल मंजुर करून दिले. ज्यामुळे आज ते एक चांगल्या घरात राहत आहे मुहम्मदीया कॉलनी येथील शमशानभुमीत नवीन लाईट डी.पी बसविले आणि परिसरातील मोठ्या प्रमाणात विद्युत पोल टाकले फक्त आणि फक्त पोलच टाकले नाही त्यावर लाईट ही बसविले ज्यामुळे परिसर जगमगु लागला प्रभागात रोड, नाली, रस्ते हेच कामे केले नाही तर समाजकार्य म्हणुन आणि आपला कर्तव्य समजुन प्रभागातील नागरीकांच्या सुख दुखात ते नेहमीच पुढे आहे दवाखाना असो की शासकीय कार्यालय असो प्रभागातील नागरीकांना मदत करणे हे अझर मोमीन आपला कर्तव्य समजून काम करतात अशा या जिगरबाज नगरसेवकांना पुन्हा नगरसेवक करण्याची संधी प्रभागातील मतदारांच्या हाती आली असून येणाऱ्या २ डिसेंबरला पंतग या चिन्हा समोरील बटन दाबून मोमीन अझहर यांना दुसऱ्यांदा नगरसेवक करून प्रभागातील राहीलेले विकास कामे पुर्ण करण्यासाठी नगरसेवक म्हणून नगरपालिकेत पाठविण्याचा निर्णय मतदारांनी घेतला आहे असे काहीसे वातावरण प्रभागातून दिसून येत आहे.

## 'योगेश पर्व'

मूळ गेवराईत कसोटी कायम, बीडमध्ये 'जादूची कांडी' कोणती ?

पंडित बंधूंचा मूळ मतदारसंघ गेवराई असला तरी, तेथे पालिकेवर मागील अनेक वर्षांपासून लक्ष्मण पवार यांची सत्ता आहे आणि यंदाही त्यांना माजी मंत्री बदामराव पंडित व बाळराजे पवार यांचा प्रबळ विरोध आहे.

त्यामुळे गेवराईतच त्यांची कसोटी कायम असताना, बीडमध्ये यशासाठी त्यांना कोणती 'जादूची कांडी' फिरवावी लागणार, याकडे लक्ष लागले आहे.

तसेच डॉ. क्षीरसागर यांना बाजूला सारल्यामुळे बीड ३ शहरासाठी पंडित गटाकडे हवी तेवढी प्रभावी स्थानिक यंत्रणा आणि नेटवर्क नसल्याची चर्चा आहे.

याच पार्श्वभूमीवर, माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी पत्रकार परिषदेत, 'राजुरीच्या आधी गेवराई बीडमध्ये ४ आली,' असा दावा करत, 'आपणच अधिक स्थानिक' असल्याचा अप्रत्यक्ष दावा करून बाहेरील नेतृत्वाच्या टीकेला उत्तर दिले.

## उपमुख्यमंत्री अजित

काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती, मात्र पोलिसांनी ती नियंत्रणात आणली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून ताफ्याचा वेग, दुचाकीचा रस्ता ओलांडण्याचा क्षण किंवा मार्गावरील गर्दी यापैकी कोणत्या कारणामुळे अपघात झाला याची चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून, पुढील तपास संबंधित पोलिस विभागातर्फे सुरू करण्यात आला आहे.

## अकबर बॉस राष्ट्रवाद

रंगत आहे. अकबर बॉस यांनी पक्ष प्रवेशानंतर एक महत्त्वाचा निर्धार जाहीर केला आहे. पेठबीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवक प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी 'जीवाचे रान' करणार असल्याचा त्यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्यांच्या या घोषणेने स्थानिक पातळीवर पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण झाला असून आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद अधिक भक्कम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरून

## बीडमध्ये अजितदादांच्या

शेख आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांचे अनेक प्रमुख नेते व कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून उपस्थित होते. सायंकाळी ४ ते ५ या वेळेत प्रभाग क्र.६ मध्ये आमदार सना मलिक यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोठी पायी रॅली काढण्यात आली. कारंजा टॉवर येथून निघालेल्या या पायी वादळाने अजिजपुरा, किल्ला मैदान, बलभीम चौक, कारंजा आणि जुना बाजार पर्यंतचा परिसर अक्षरशः घड्याळमय करून टाकला. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या नागरिकांनी आमदार मलिक यांचे जोरदार स्वागत झाले. रॅलीच्या माध्यमातून त्यांनी लाखो मतदारांचे काळीज जिंकले. कॉर्नर सभांमधून विरोधकांना सडेतोड आव्हान देण्यात आले. पायी रॅलीनंतर आमदार सना मलिक यांनी थेट मतदारांशी संवाद साधत विरोधकांच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला. मोमीनपुरा येथील सभेत देखील उत्साहाचे वातावरण होते. आ. मलिक यांनी प्रेमलता दादाराव पारवे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाच्या सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. विजयी पॅनलसाठी प्रमुख कार्यकर्त्यांची मोट बांधली आहे. आमदार सना मलिक यांनी बीडमध्ये परिवर्तनाची हाक दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस मित्रपक्षांचे पारडे जड झाले आहे.

## सगळेच झटणार

पाठीशी मतरूपी आशिर्वादाचा ढिग लागेल असा विश्वास जनतेतून व्यक्त होत आहे. बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांना परिचीत असलेला नगर सेवक म्हणजे अमर नाईकवाडे. कोणतेही काम असो, कोणत्याही वार्डातील असो त्याच्यासाठी लगेच पळायला तयार, नगर पालिका, तहसिल, अन्य कार्यालयात नेहमी जनतेच्या कामासाठी हजर असणारा नाना पुन्हा वार्ड क्रमांक ३ मधून निवडणूक रिंगणात आहे. मागच्या १४ वर्षात केलेल्या कामाच्या बळावर मतदान मागत आहे. मात्र अमरनानांना पराभूत करण्यासाठी आणि वार्डात गुंतवून ठेवण्यासाठी दोन्ही क्षीरसागर सरसावले आहेत. येथील वार्ड क्रमांक ३ ब्राम्हणवाडी आणि परिसरातून अमर नाईकवाडे हे नगर सेवक आहेत. वार्डातील सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन त्यांच्या सुख, दु:खात धावून येणारा नाना वार्डातील लोकांनी पाहिला आहे. कोविडमध्ये केलेले रेशनचे वाटप असो,वार्डातील कोविडग्रस्तांना रुग्णालयात दाखल करायचे असो, संजय गांधी निराधार श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळवून द्यायचा असो, नगर पालिकेतील कोणते प्रमाणपत्र काढायचे असो, नाना स्वतः जातीने हजर असतो. आजही वार्डातील ९०% रस्त्यांची कामे त्यांनी पूर्ण केली आहेत. हनुमान नगर आणि भीम नगरमधील आचारसंहितेपुर्वी मंजूर झालेली कामे सध्या सुरु आहेत. उमेदवारी अर्जाच्या छाननीच्या वेळी नानांनी आक्षेप घेतल्याबद्दल विरोधक या मुद्याला हवा देण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु निवडणूक लढवित असतांना ती शक्ती आणि युक्ती दोन्हीचा वापर करुन लढावी लागते. एखाद्या उमेदवाराच्या चुकीच्या बाबींवर आक्षेप घेणे ही नित्य प्रक्रिया आहे. याचे एवढे भांडवल करायची गरज नाही. कोणीही उमेदवार असला तरी तो विरोधकाची काही उणी बाजु दिसली तर - त्यावर आक्षेप घेतो, आक्षेप घेणे हे स्वाभाविक आहे.

## बीडच्या विकासाचं

पवार पक्षाच्या प्रचाराला मतदारांमधून तुफान प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवार (दि.२१) रोजी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ.स्मिताताई विष्णू वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक ९ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शेख अथर (बब्बूभाई) , सौ.रेखाताई पिंगळे तसेच प्रभाग क्रमांक २१ चे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार कु.पोर्णिमा चव्हाण व विपूल गायकवाड यांच्या प्रचारार्थ शहरातील शाहूनगर आणि गांधीनगर भागात कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागरांसह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील बैठकीस या भागातील हजारो मतदार उपस्थित होते. त्यामुळे या दोन्ही बैठकांना अक्षरशः सभेचे स्वरूप आले होते.

## वार्ड क्रमांक १९

आधीपासूनच आहे. त्यामुळे वॉर्ड १९ मधील समीकरणे झपाट्याने बदलण्याची शक्यता व्यक्त केली जातआहे.१८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतरची एंट्री विरोधकांमध्ये अस्वस्थता सँडी ग्रुपने अनेक वर्षे सक्रिय राजकारणात दूर राहूनसुद्धा स्थानिकांमध्ये आपली पकड कायम ठेवली आता १८ वर्षांनी त्यांनी हुकमी चाल टाकताच विरोधकांमध्ये स्पष्ट अस्वस्थता निर्माण झाली आहे. वॉर्डमधील मतदारांमध्येही आता सामना रंगणार अशी उत्सुकता वाढली आहे.आगामी चित्र कसे? वॉर्ड १९ मध्ये आता तीन प्रमुख गटांचे समीकरण, स्थानिक प्रकल्प, गतविकास आणि वैयक्तिक प्रभाव यावरच सर्व काही अवलंबून राहणार आहे. सँडी ग्रुपने दाखवलेला आत्मविशास, योगेश भैय्या यांचा प्रभाव आणि परसराम जाधव यांची वाढती जनाधार हे सर्व एकत्र आल्याने या वॉर्डची निवडणूक बीडमधील सर्वात हाय-प्रोफाइल लढत ठरणार अशी चर्चा रंगू लागली आहे.

## प्रभाग क्रं. १७ मध्ये

यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दोन तगडे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरविले आहेत. अ‍ॅड.महेश धांडे यांच्या सोबतीला शेख बिलाल यांच्या पत्नीला पक्षाने अधिकृत उमेदवारी जाहिर केली आहे. शेख बिलाल हे मागील पाच वर्षापासून या प्रभागात विकास कामे करत आहेत. सामाजिक कार्याबरोबरच प्रभागातील नागरिकांना मुलभुत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते नेहमी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या प्रयत्नातुन प्रभागात अनेक ठिकाणी सिमेंट रस्ते, नाल्या तसेच स्वच्छता सह विद्युत प्रश्न मार्गी लागले. पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणुन शेख बिलाल यांची ओळख आहे. प्रभागात शेख बिलाल यांचा मोठा दांडगा जनसंपर्क असुन मित्र परिवारांची मोठी संख्या या प्रभागात आहे. प्रभागाच्या विकासाचा मोठे आलेख व नियोजन शेख बिलाल यांच्या व्हिजन आहे. शेख बिलाल यांना नगरसेवक करण्याचे प्रभागातील मतदारांनी निश्चिय केला असून येणाऱ्या ३ तारखेला विजयाचा गुलाल उधळण्याचा निश्चित प्रभागातील मतदारांनी केला आहे. अत्यंत नियोजनबध्द शेख बिलाल यांचा प्रचार या प्रभागात सुरू आहे. प्रभागातील प्रत्येक मतदारांपर्यंत शेख बिलाल हे पोहचले असून प्रत्येकांनी त्यांना निवडून देण्याचे वचन दिले आहे. पाच वर्षापासून करत असलेल्या कामांमुळे शेख बिलाला यांना या प्रभागातून कोणतीच अडचण दिसून येत नाही. मित्र परिवार आणि नातेवाईक मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना विजय गुलाला गाठणे अवघड नाही. काल राष्ट्रादी काँग्रेस पक्षाच्या आ.सना मलिक यांनी प्रभागात प्रचार रॅली केली. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मतदारांकडून मिळाला. रॅलीला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादावरून शेख बिलाल यांचा विजयावर शिक्कामोर्तब झाला असून त्यांच्या सोबत जोडीदार असणारेअ‍ॅड.महेश धांडे यांच्या सोबत ते पूर्ण प्रचार यंत्रणा राबवित आहेत. दोघांच्या जोडीने या प्रभागाला एक अभ्यासू आणि व्हिजन असणारे नगरसेवक मिळणार आहेत. २ डिसेंबरला घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून शेख बिलाला यांचा विजयी करण्याचा निश्चिय मतदारांनी केला आहे.